**निशाणी क्र. ३२ वरील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे कलम २६ नियम ९ व १० अन्वये वाद मिळकतीचे अतिक्रमण निश्चित करण्याकरिता मोजणीसाठी न्यायालयीन आयुक्तांच्या नियुक्तीकरिता दिलेला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील थोडक्यात कथन असे की, यापुर्वी कमिशनर नियुक्तीचा अर्ज मा. न्यायालयाने मंजुर केला होता. परंतु, यातील कमिशनर यांनी मा. न्यायालयाचे आदेशान्वये जायमोक्यावर प्रत्यक्ष पोटहिश्याची मोजणी न करता चुकीचा नकाशा व अहवाल सादर केला आहे. वादी यांनी मौजे वरूड बुद्रूक शिवारातील जमीन गट क्र. ६६ क्षेत्रफळ २ हेक्टर ७५ आर पैकी वादीच्या मालकिची १ हेक्टर ७४ आर जिची चतुःसिमा पुर्वेस हफिजाबी बादशाहा, पश्चिमेस शेख अकबर शेख बुढण, दक्षिणेस सांडु उखर्डा व उत्तरेस तुकाराम पुंडलीक यांची जमीन अशी असून सदर जमिनीलगत पश्चिमेकडून दक्षिण–उत्तर बांध अस्तीत्वात आहे. सदर बांध प्रतिवादी यांनी नष्ट केला आहे. त्यामूळे प्रतिवादींनी वादीच्या जमिनीवर अतिक्रमण निश्चित करण्याबाबतचा दावा दाखल केला आहे. त्यामूळे वादीच्या ताब्यात १ हेक्टर ७४ आर जमीन आजरोजी प्रत्यक्षात आहे काय ?, वादी व प्रतिवादी यांच्या ७/१२ उता–याप्रमाणे प्रत्यक्ष वादी व प्रतिवादी यांचा ताबा आहे काय ? तसेच प्रतिवादी यांनी वादीच्या जमिनीस लागुन पश्चिमेकडून दक्षिण–उत्तर बांध फोडून वादीच्या क्षेत्रावर अतिक्रमण केले काय व केले असल्यास किती क्षेत्रावर अतिक्रमण आहे याची शहानिशा करून अहवाल सादर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे देऊन असे कथन केले की, प्रस्तुत प्रकरणात याअगोदर कोर्ट कमिशन नियुक्त करून मोजणी झालेली आहे, त्यामूळे परत मोजणी करता येणार नाही. तसेच वेगवेगळया मोजणी मुळे वेगवेगळे निष्कर्ष निघतात व न्यायालयाची दिशाभूल करण्यासाठी वादींनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यामूळे सदरील अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. सदरकामी निशाणी क्र. १३ प्रमाणे वादीनी मोजणीचा अर्ज दाखल केला होता. सदर अर्जावरील आदेशान्वये गट क्र. ६६ या जमिनीची मोजणी करून सविस्तर मोजणी नकाशा, त्या गटाचे एकूण क्षेत्रफळ व एकूण क्षेत्रफळाप्रमाणे काही अतिक्रमण असल्यास तसे दर्शवून अहवालासह दाखल करणेबाबत तालूका निरिक्षक, भुमी अभिलेख यांना निर्देशित करण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी मोजणी करून निशाणी क्र. ३४ प्रमाणे मोजणी अहवाल नकाशासह दाखल केला आहे. तथापी, सदर मोजणी अहवालासोबत जोडलेल्या नकाशाचे अवलोकन केले असता सदर नकाशामध्ये वादीच्या मालकीच्या १ हेक्टर ७४ आर क्षेत्रामध्ये वादीच्या ताब्यात किती क्षेत्र आहे व किती क्षेत्रावर ताबा केला आहे हे स्पष्टरितीने नमूद केलेले नाही. अशाप्रकारे नकाशामध्ये निश्चित अतिक्रमण दाखविले नसल्यामूळे वादीचा अतिक्रमण काढून मिळणेची मागणीबाबत न्यायनिर्णयामध्ये कारणमीमांसा व निष्कर्ष नोंदविणे शक्य होणार नाही. यास्तव, दावा मिळकतीची फेरमोजणी करणे आवश्यक आहे. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहेः

## आदेश

०१. प्रस्तूतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. तालूका निरीक्षक, भूमी अभिलेख, भोकरदन येथील मोजणीदार यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात येते.

०३. न्यायालयीन आयुक्त यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी मौजे वरूड बुद्रूक, ता. भोकरदन, जि. जालना येथील वादी यांची मिळकत गट क्र. ६६ मधील वादी यांच्या मालकीच्या जमिनीवर प्रतिवादी यांनी अतिक्रमण केले असल्यास, तसेच या गटामध्ये सह भागीदार असल्यास सर्व सह भागीदारांची व प्रतिवादीच्या जमिनींची फेरमोजणी करून सविस्तर मोजणी नकाशा तयार करून, वाद मिळकत गट क्र. ६६ मधील वादींच्या नावे दर्शविलेल्या जमिनीवर काही एक अतिक्रमण असल्यास व ते अतिक्रमण कोणी, कोणत्या बाजूने केले आहे हे त्याच्या क्षेत्रफळासह दर्शवून त्यांचा मोजणी नकाशा अहवालासह या न्यायालयाची रीट मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत न चुकता सादर करावा. न्यायालयीन आयुक्त यांनी आवश्यकता भासल्यास सदर मिळकतीं व्यतिरिक्त आजूबाजूच्या जमिनीची मोजणी करण्याचीही मुभा आहे.

०४. वादी यांनी न्यायालयीन आयुक्त यांची नियमाप्रमाणे योग्य ती फी भूमी अभिलेख विभागाकडे त्वरीत १५ दिवसाच्या आत भरावी व त्याची पावती दोन प्रतीत न्यायालयात दाखल करावी. तसेच योग्य ते दस्तऐवज संबंधीत कार्यालयात सादर करावेत.

०५. वादी यांनी वरील मुदतीच्या आत फी न भरल्यास व त्याची पावती न्यायालयात दाखल न केल्यास सदर आदेश हा आपोआप रद्द झाला असे समजण्यात येईल.

०६. वादी यांनी तशी पावती न्यायालयात जमा केल्यावर कमिशनर रिट काढण्यात यावी.

स्वाक्षरित/–

दिनांकः ०९.०३.२०२३.
भोकरदन.

(आर. व्ही. पाटील)
दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
भोकरदन

प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे
न्यायालयाने नावः दिवाणी न्यायालय क. स्तर, भोकरदन
मा. साहेबांनी चेक केले
व पी.डी.एफ. दिनांकः १०.०३.२०२३.

स्वाक्षरित/–
लघुलेखकाची सही